महाराष्ट्र शासन

# पत्रकार दिनाच्या हार्दिक शुभेच्छा



*बाळशास्त्री जांभेकर (१८१२-१८४६)*

## 'दर्पण'कार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतीस विनम्र

## अभिवादन

- **बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर** यांचा जन्म १८१२ मध्ये पोंभुर्ले, (जि.सिंधुदुर्ग) येथे झाला. वडिलांकडे घरीच बालपणी मराठी व संस्कृतचा अभ्यास. १८२५ मध्ये मुंबईत आगमन. एज्युकेशन सोसायटीच्या विद्यालयात पाच वर्षे अध्ययन करून तो मुलगा इतका विद्वान बनला की विशीच्या आत प्राध्यापक म्हणून नियुक्ती होण्याचा मान लाभलेला तो पहिला भारतीय ठरला.
- **महाराष्ट्रातील पहिले समाजसुधारक :** त्यांनी सतीची चाल, बालविवाह, स्त्रीभ्रूण हत्या, मुलींची विक्री व समाजातील अंधश्रद्धा या गोष्टींना विरोध केला. 'बाळशास्त्री जांभेकर हे आमचे आद्य समाजसुधारक होत' असे सर नारायणराव चंदावरकर म्हणत असत.
- **पहिले मराठी वृत्तपत्रकार व संपादक :** त्यांनी 'दर्पण' हे वृत्तपत्र मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषांत सुरू केले आणि सर्व विषयांचा संग्रह असलेले 'दिग्दर्शन' हे मासिकही.
- **पहिले बहुभाषिकोविद :** त्यांना मराठी, संस्कृत, बंगाली, गुजराथी, कानडी, तेलुगू, फारशी, फ्रेंच, लॅटिन व ग्रीक या भाषांचे ज्ञान होते. फ्रेंच भाषेतील नैपुण्याबद्दल फ्रान्सच्या बादशहाकडून त्यांचा मानसन्मान झाला होता.
- **पहिले अष्टपैलू पंडित :** त्यांच्यात सखोल पांडित्य आणि अध्यापनपटुत्व यांचा मिलाफ होता. ते गणित व ज्योतिष यांत पारंगत होते. म्हणून कुलाबा वेधशाळेच्या संचालकपदी नियुक्ती. शिवाय त्यांना रसायनशास्त्र, भूगर्भशास्त्र, पाशवी विद्या, वनस्पतिशास्त्र, न्यायशास्त्र, इतिहास, मानसशास्त्र या विषयांचे उत्तम ज्ञान होते. त्यांचे शिष्य डॉ.दादाभाई नौरोजी म्हणतात, बाळशास्त्री हे अतिशय बुद्धिवान, चतुर, सालस व सुज्ञ गुरू होते. १८३४ मध्ये एल्फिन्स्टन कॉलेजात गणित, वाङ्मय व विज्ञान या विषयांचे पहिले एतद्देशीय लेक्चरर म्हणून नियुक्ती. १८३२ मध्ये शाळा खात्याकडून **'नेटिव्ह सेक्रेटरी'** म्हणून नियुक्ती.
- **महाराष्ट्रातील पहिले इतिहास संशोधक :** प्राचीन लिप्यांचा अभ्यास करून त्यांनी कोकणातील शिलालेख व ताम्रपट यांचे शोधनिबंध लिहिले.
- **लोकशिक्षणाचे आद्य प्रवर्तक :** त्यांनी लोकशिक्षणासाठी नेटिव्ह इम्प्रूव्हमेंट सोसायटी या नावाची संस्था काढली. त्या दृष्टीने सार्वजनिक वाचनालये व ग्रंथालये यांचे महत्त्वही बाळशास्त्री चांगले ओळखून होते. १८४५ मध्ये त्यांनी 'बॉबे नेटिव्ह जनरल लायब्ररी' या ग्रंथालयाची स्थापना केली. अध्यापक घडवणाऱ्या नॉर्मल स्कूलच्या संचालकपदी नियुक्ती.
- **ज्ञानेश्वरीचे आद्य प्रकाशक :** ज्ञानेश्वरी मुद्रित स्वरूपात त्यांनीच प्रथम वाचकांच्या हाती दिली.
- **त्यांची अनेक विषयांशी संबंध असलेली ग्रंथसंपदा :** बाळव्याकरण, नीतिकथा, सारसंग्रह (यात छंदशास्त्र, नीतिशास्त्र, साहित्यशास्त्र वगैरे विषय), भूगोलविद्या, इंग्लंड देशाची बखर- भाग १ व भाग २, भूगोलशास्त्र, ('गणितशास्त्र' यांत भास्कराचार्यांच्या मतांचा शब्दाविषयी विचार) मरे यांच्या इंग्रजी व्याकरणाचा संक्षेप, शब्दसिद्धी निबंध, हिंदुस्थानचा इतिहास, हिंदुस्थानातील इंग्लिशांच्या राज्याचा इतिहास, गणितशास्त्राच्या उपयोगाविषयीचे संवाद, पुनर्विवाह प्रकरण, मानसशक्तीविषयीचे कार्य, शिक्षानीति (कसे शिकावे याबद्दल), शून्य गणित, 'Differential and Integral calculus' या ग्रंथांचे भाषांतर.
- महाराष्ट्रातील हे आद्य समाजसुधारक, वृत्तपत्रकार, निबंधकार, भाषांतरकार, इतिहाससंशोधक, व्याकरणकार, गणितज्ञ, शिक्षणशास्त्रज्ञ व प्रकाशक १७ मे १८४६ रोजी वयाच्या ३४ व्या वर्षी मृत्यू पावले.



पृथ्वीराज चव्हाण
मुख्यमंत्री



अजित पवार
उपमुख्यमंत्री

***अमुचा महाराष्ट्र आघाडीचा - पुरस्कर्ता अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा***

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन